नियमीत दि. दावा क्र. २०/२०१५
तुकाराम वि. विठाबाई
नि.क्र. ८६ खाली

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एच. आर. गुप्ता यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

९. सुरेश बोहरे हा माझा छोटा भाऊ आहे. मिळकत क्रमांक ५९७ ही तुकाराम बोहरे याच्या मालकीची आहे. मिळकत क्रमांक ५९७ ही माझे भावाचे नावे असल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी दाखल करु शकतो. मिळकत क्र. ५९७ चे क्षेत्र किती आहे हे मला सांगता येणार नाही. मिळकत क्र. ५९६ ही मिळकत वादी क्र. १ व प्रतिवादी यांचे नावे आहे. मिळकत क्र. ५९६ चे क्षेत्र किती आहे हे मला सांगता येणार नाही. मिळकत क्र. ५९५ चे पाठीमागील भागामध्ये प्रतिवादी हिची गेली २० वर्षे झोपडी आहे. प्रतिवादी हिची झोपडी किती क्षेत्रामध्ये आहे हे मला सांगता येणार नाही. मिळकत क्र. ५९५ ही वादी क्र. १ याचे नावे आहे. मिळकत क्र. ५९५ याचे क्षेत्र १०५० चौरस फुट एवढे आहे. मिळकत क्र. ५९५ यामध्ये प्रतिवादी हिचे नाव महसुल पत्रकी नाही. मिळकत क्र. ५९५ चे महसुल पत्रकी वादी क्र. १ ते ४ यांची नावे आहेत. मिळकत क्र. ५९५ क्षेत्र १०५० चौरस फुट ही मिळकत वादी क्र. १ याच्या ताब्यात आहे.

१०. मिळकत क्रमांक ५९५,५९६ व ५९७ यामध्ये तोंडी वाटप झाले होते. तोंडी वाटप हे सुमारे ५० वर्षांपुर्वी झाले होते. मिळकत क्र. ५९५ क्षेत्र १०५० चौरस फुट ही वादी क्र. १ याच्या हिस्याला, मिळकत क्र. ५९६ मधील २० बाय २५ फुट जागा प्रतिवादीच्या पतीला हिस्याला व उर्वरीत क्षेत्र वादी क्र. १ याच्या हिस्याला गेली. तसेच मिळकत क्र. ५९७ ही वादी क्र. १ याच्या हिस्याला गेली. मिळकत क्र. ५९७ ही रिकामी जागा आहे. मिळकत क्र. ५९५ क्षेत्र १०५० चौरस फुट यावर फाउंडेशन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मिळकत क्र. ५९५,५९६ व ५९७ याबाबत कोणतीही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर नमुद मिळकत क्र. ५९५,५९६ व ५९७ बाबत दिलेली माहिती संपुर्ण खोटी व चुकीची आहे.

११. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत क्र. ५९५ मध्ये फाउंडेशन आहे असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत क्र. ५९५ मधील दक्षिणेकडील अर्धी जागा प्रतिवादी हिची आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. २ मध्ये दावा मिळकतीचे दिलेले वर्णन खोटे व चुकीचे आहे. आता मला दाव्यासोबत जोडलेला

कच्चा हातनकाशा दाखविला. सदरचा हातनकाशा हा माझे विधिज्ञ यांनी प्रत्यक्ष जागेवर येवुन तयार केलेला आहे. माझे विधिज्ञ ज्यावेळी प्रत्यक्ष जागेवर आले त्यावेळी मी तेथे उपस्थित नव्हतो. माझे विधिज्ञ हे प्रत्यक्ष जागेवर आले व त्यांनी नकाशा तयार केला ही बाब मला वादी क्र. १ याने सांगीतली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील परिच्छेद क्र. ३ ते ८ मधील संपुर्ण मंजकुर खोटा व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : ०६/१२/२०२५** **दिवाणी न्यायाधिश क-स्तर, आमगांव**

नि.फौ.ख.क्र.१३५/२०१९
सरकार / टामेंद्र
नि.क्र. ३३

**<u>सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ८ ची जबानी,</u>**
**<u>मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

माझे नांव : योगराज बाबूलाल रहांगडाले,
वय : ५४ वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : बोरकन्हार, ता.आमगांव, जि.गोंदिया

**<u>सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु</u>**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. फिर्यादीला ओळखत नाही. घटनेबाबत मला काहीही माहित नाही.

**[साक्षदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकीलांनी उलटतपासात विचारता येण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली - परवानगी देण्यात येते. ]**

२. आता मला माझे पोलीसांसमोरील जबाबातील **अधोरेखांकीत भाग ब** वाचून दाखविला. सदरचा मजकूर मी पोलीसांना सांगीतला नव्हता. पोलीसांनी तो का लिहीला याचे कारण मी सांगू शकत नाही.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. वाय. एच. उपराडे यांचे मार्फत सुरु -**

उलटतपास नाकारला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : १६/०७/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव**

नि.फौ.ख.क्र.१३५/२०१९
सरकार / टामेंद्र
नि.क्र. ३४

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ९ ची जबानी,**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**

माझे नांव : हरीश खुशाल ब्राम्हणकर ,
वय : ४९ वर्षे, कामधंदा : शेती
राहणार : बनगांव , ता.आमगांव, जि.गोंदिया

**सरकार तर्फे सहा. सरकारी अभीयोक्ता श्री आर.डब्ल्यु बोरकर यांच्या मार्फत साक्षदाराचा सरतपास शपथेवर सुरु**

१. मी आरोपीला ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. फिर्यादीला ओळखत नाही. घटनेचा निश्चीत दिनांक मला आठवत नाही. घटना ही मार्च २०१७ मध्ये घडलेली असेल. मला त्या दिवशी मनोज शरनागत याचा फोन आला होता. त्यानी मला सांगीतले की, बबलू कटरे सरांच्या गाडीचा अपघात झालेला आहे. त्यानंतर आम्ही आमगांव येथून दहेगांव येथे जाण्यास निघालो. घटनास्थळावर कोणही नव्हते. तेथे रस्त्याच्या खाली दहा ते बारा फुट एक गाडी दिसून आली. त्यानंतर आम्ही दहेगांव बस स्टँडवर गेलो. तेथे आम्हाला माहिती मिळाली की, ड्रायव्हर याला गोंदिया येथे घेऊन गेलेले आहेत. गोंदिया येथे जाऊन माहिती काढली असता डॉ. राउत यांच्याकडे दाखल केलेले आहे असे समजले. त्यावेळी तेथे नानू चौधरी हा होता. तो माझ्याकडे आला व त्याने त्याच्या हातून अपघात झालेला आहे असे सांगीतले. तसेच त्याला पोलीसांना माहिती द्यायची आहे असे सांगीतले. त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. वाय. एच. उपराडे यांचे मार्फत सुरु -**

२. हे म्हणणे खरे आहे की, नानू चौधरी याने अपघात कसा झाला हे मला सांगीतले नाही.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

**आमगांव** **(समीर गोपाळ गुणारी)**
**दिनांक : १६/०७/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आमगांव**